## पुल छाननी समितीची पुनर्रचना

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्र. आरएमआर १०२००६/ प्र. क्र.६/ नियोजन.३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक-१५/०२/२००६

*वाचा* - (१) शासन निर्णय क्रमांक - आरएमआर १०९०/ सीआर २५/ र-१, दिनांक ३१ मार्च, १९९०
(२) शासन परिपत्रक क्रमांक - आरएमआर १०९०/ सीआर २५/ र-१, दिनांक १५ जानेवारी, १९९३
(३) शासन परिपत्रक क्रमांक - आरएमआर १०९०/ सीआर २५/ र-१, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५
(४) शासन निर्णय क्रमांक - इएसटी - २००२/ प्र. क्र.८६/ प्रशासन-१, दिनांक २८ मार्च २००३

राज्यातील २०० मी. किंवा त्यापेक्षा जास्त लांबीच्या पुलांच्या संकल्पनाची छाननी करण्यासाठी वर उल्लेखित शासननिर्णयान्वये शासनस्तरावर पूल छाननी समितीचे गठण करण्यात आले होते. सदर समितीत सचिव (रस्ते) हे अध्यक्ष, मुख्य अभियंता व सहसचिव, मंत्रालय हे आमंत्रक, अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ (पूल) सदस्य सचिव तर अन्य मुख्य अभियंता स्तरावरील अधिकारी सभासद / नियंत्रक म्हणून नेमण्यात आले होते.

दि.२८ मार्च २००३ च्या शासननिर्णयान्वये, तीन संकल्पचित्र मंडळांवर नियंत्रण ठेवणे व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), नवी मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या परिस्थितीत पूल छाननी समितीत, त्यांचा सहभाग असणे स्वाभाविक व आवश्यक ठरले आहे. तसेच संकल्पचित्र तत्त्वज्ञान व तंत्रज्ञान यासंबंधी क्षेत्रीयस्तरावरील हे सर्वोच्च पद असल्याने पूल समितीचे पुनर्गठण त्यांचे अध्यक्षतेखाली करणे पर्याप्त आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

निर्णय - वरील परिस्थितीचा विचार करून शासनाने असा निर्णय घेतला आहे की,

१. दि.३१.३.१९९० च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेली छाननी समिती सुधारित करण्यात येत असून तिची रचना परिच्छेद २ प्रमाणे असेल.

२. पूल छाननी समिती

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), नवी मुंबई | - | अध्यक्ष |
| २. मुख्य अभियंता व सहसचिव मंत्रालय | - | आमंत्रक |
| ३. संबंधीत क्षेत्रीय मुख्य अभियंता (ज्यांच्या अधिपत्याखाली पुलाचे बांधकाम होणार आहे.) | - | सभासद |
| ४. संबंधीत अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ (पूल) (ज्यांच्या अधिपत्याखाली पुलाचे संकल्पन होणार आहे.) | - | सदस्य सचिव |
| ५. संबंधीत क्षेत्रीय अधीक्षक अभियंता (ज्यांच्या अधिपत्याखाली पुलाचे बांधकाम होणार आहे.) | - | सभासद |

३. संदर्भाधीन अनुक्रमांक क्र.१ च्या शासननिर्णयातील परिच्छेद २ ते ५ मधील सूचना कायम राहतील. ही पुनर्रचित समिती या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अस्तित्वात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

*(मा. श. उ*

*उपसचिव, महारा*

प्रत,

*मा. मंत्री (सा. बां.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई*
*मा. राज्यमंत्री (सा. बां.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई*
*मा. सचिव (रस्ते) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई*
*मा. सचिव (बांधकामे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई*
*मुख्य अभियंता (रा.म.)*
*मुख्य अभियंता व सहसचिव*
*अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ (पूल)/ इमारती*
*सर्व मुख्य अभियंता*
*सर्व अधीक्षक अभियंता*
*सर्व कार्यकारी अभियंता (जिल्हा परिषदसह)*
*सर्व तांत्रिक अधिकारी, मंत्रालय, मुंबई - ३२*
*संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण*

प्रत माहितीसाठी -

सचिव (जलसंपदा)